जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२६४/२०२१

प्रेसनोट

दिनांक - १६/०१/२०२१

मावळ तालुकातील ग्रामपंचायतचा निकाल दि.१८/०१/२०२१ रोजी कै.पै विश्वनाथ भेगडे क्रिडा संकुल मारुती मंदीर चौक तळेगांव येथे मतदानाचा निकाल घोषित होणार आहे. सदर निवडणुक प्रकिये कामी मतपेटी घेवुन येणे या संदर्भात निवडणुक कर्मचारी यांचे वाहने तसेच सदर प्रकरणी बरेच वाहने सदर ठिकाणी येणार असुन सदर ठिकाणी वाहतुकीचे नियोजन करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ, भा.पो.से पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

<u>देहुरोड तळेगाव वाहतुक विभाग अंतर्गत</u>

१) लिंब फाटा ते मारुती चौक मार्गे तळेगांव शहरात जाणारी वाहतुक पुढे जाण्यास मनाई करण्यात आली आहे.

पर्यायी मार्ग :- लिंब फाटा सरळ जावुन डावीकडे वळुन अन्नपुर्णा हॉटेल - वाडेकर बंगला - मा.आमदार निवास - खांडगे पेट्रोल पंप मार्गे तळेगावगाव शहरात वळविण्यात येणार आहे.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन तार्त्पुता स्वरुपात आदेश काढण्यात येत आहे. वरील मार्गावर दि.१८/०१/२०२१ रोजी सकाळी ०५.०० ते २३.०० वाजे पर्यत वाहतुक वळविणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.

Shreemath

**सुधीर हिरेमठ** (भा.पो.से.)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **देहुरोड तळेगाव** वाहतुक विभाग

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, देहुरोड कंन्टोन्मेंट बोर्ड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.